# मराठी अर्थशास्त्र परिषद

## सोसायटी रजिस्ट्रेशन

अॅक्ट - १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट अॅक्ट - १९५०
अन्वये नोंदविलेली नोंदणी क्र.एफ - ४६१५ मुंबई

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।








# ४६ वा वार्षिक अहवाल

सन २०२३-२४

# ४६ वा वार्षिक अधिवेशन

२५,२६ व २७ नोव्हेंबर २०२३

* आयोजक *


पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय,सासवड ता.पुरंदर जि.पुणे


प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे
अध्यक्ष


प्रा.डॉ.अविनाश निकम
कार्याध्यक्ष


डॉ.मारोती तेगमपुरे
कार्यवाह - खजिनदार


प्रा.डॉ.राहुल म्होपरे
संपादक - अर्थसंवाद


प्राचार्य डॉ.संजय धनवटे
सदस्य


डॉ.विजय भोपाळे
सदस्य


डॉ.सुरेश घुमटकर
सदस्य


डॉ.जयवंत इंगळे
सदस्य


डॉ.बाळासाहेब पाटील
सदस्य


डॉ.सुभाष सावंत
सदस्य


डॉ.विठ्ठल ठावरी
सदस्य


डॉ.जितेंद्र तलवारे
सदस्य


डॉ.राजाराम पाटील
सदस्य


डॉ.हनुमंत भोसले
सदस्य


डॉ.राजु शिंदे
सदस्य


डॉ.लक्ष्मण धोंडे
सदस्य


डॉ.अजय दरेकर
सदस्य


प्रा.डॉ.बालाजी घुटे
स्थानिक कार्यवाह


प्रा.डॉ.विकास सुकाळे
विश्वस्त


डॉ.विठ्ठल घिनमीने
विश्वस्त


डॉ.धोंडीराम पवार
विश्वस्त

## मनोगत

४६ वर्षांची वाटचाल यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या आपल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेला समृद्ध, वैचारिक आणि उज्ज्वल ऐतिहासिक परंपरा आहे. महाराष्ट्र राज्य हे ज्ञानसंपन्न, गुणसंपन्न आणि प्रतिभा संपन्न असे पुरोगामी राज्य असून सामाजिक परिवर्तनाचे बीज असणाऱ्या भक्कम अर्थशास्त्र अभ्यासकांची एक फळी निर्माण करण्याचे अमूल्य असे कार्य मराठी अर्थशास्त्र परिषदेने केले आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य भारतभर असून गुजरात, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगढ़, कर्नाटक आणि गोवा या बरोबरच विदेशातही आहेत. सर्वत्र शिस्तीची, आपल्या निष्ठेची, अभ्यासाची छाप निर्माण करणाऱ्या या संस्थेचा कार्यवाह-खजिनदार असल्याचा मला सार्थ अभिमान वाटतो. याबरोबरच ही संधी केवळ आपल्यामुळेच प्राप्त झाल्याची जाणीवही मला आहे. या दीर्घ काळात परिषदेला आदरणीय प्रा.रविंद्र सबनीस, प्रा.व्य.सु पाटणकर, डॉ.आ.गो पुजारी, डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्रा.चारूदत्त गोखले, डॉ.अनिल सूर्यवंशी आणि डॉ. राजेंद्र भांडवलकर यांनी कार्यवाह-खजिनदार पदाची धुरा अत्यंत निष्ठापूर्वक शिस्तबद्ध पद्धतीने आणि आर्थिक नियोजनात वाहिली आहे. या सर्वांनी या पदाला एक उज्ज्वल परंपरा व आदर्श संकेत निर्माण करून दिले आहेत. या सर्वांच्या निस्वार्थ कार्याबद्दल मी नितांत आदरभाव प्रकट करतो.

मागे वळून पाहत असताना मागील ४६ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत परिषदेला नावलौकिक प्राप्त होऊन राष्ट्रीय पातळीवर लोकमान्यता मिळवून देण्याचा प्रयत्न झाला आहे. सातत्याने विविध उपक्रम, नियमित वार्षिक अधिवेशन आणि अनेक पुरस्कार व पारितोषिकांच्या माध्यमातून परिवारातील घटकाला प्रोत्साहित करणारी मराठी अर्थशास्त्र परिषद एकमेवाद्वितीय ठरते. परिषदेच्या एकूणच जडणघडणीमध्ये परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नी. वि. सोवनी याबरोबरच डॉ. वि.म. दांडेकर, डॉ. श्री.आ. देशपांडे, डॉ.वि.वि.बोरकर, प्राचार्य या. शि.महाजन, डॉ.आनंद नाडकर्णी, डॉ.स.ह. देशपांडे, डॉ. वि.बा.घुगे, डॉ.ह.कृ.परांजपे, डॉ.रविंद्र सबनीस, डॉ. गो.सी.कल्याणकर, डॉ.नलिनी पंडित, डॉ.रविंद्र दोशी, डॉ.श्रीनिवास खांदेवाले, डॉ.ज.फा. पाटील, डॉ.शशिकांत गंधे, डॉ.व्य.सु.पाटणकर, डॉ.के.जी.पठाण, प्रा.शि.ना.माने, डॉ.म.ग.बापट, डॉ.दि.व्य.जहागिरदार, डॉ. र.पु.कुरुलकर, डॉ.सु.दा.तुपे, डॉ.भालचंद्र मुणगेकर, डॉ.अ.रा.पडोशी, डॉ.संतोष दास्ताने, डॉ. सूर्यकांत जगदाळे, डॉ. मधुकर शिंदे, डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्रा.दिलीप कदम, डॉ.पी.बी.कुलकर्णी, डॉ.व्ही.बी.भिसे, डॉ. विनायक देशपांडे, डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, डॉ.आ.गो.पुजारी, डॉ.कैलास पाटील, प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ.श्रीराम जोशी,डॉ. सुहास आव्हाड, डॉ. शिवाजी भोसले, डॉ. रामचंद्र रसाळ, प्रा. चारूदत गोखले, डॉ. रामदास माहोरे , प्राचार्य डॉ.अनिल सूर्यवंशी, प्रा.डॉ. आर.बी. भांडवलकर , प्रा. डॉ. दिलीप अर्जुने आणि प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. त्यामुळे त्यांचा नामोल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे याबरोबरच माजी व सद्याचे कार्याध्यक्ष माजी कार्यवाह-खजिनदार, अर्थसंवादचे सर्व माजी व सध्याचे संपादक, माजी व सद्याचे विश्वस्त यांचेही योगदान उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे सर्व माजी व सद्या कार्यरत सदस्यांचेही योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण अशा स्वरूपाचे राहिलेले आहे. आपल्या या परिवारातील सर्व सन्माननीय सदस्यांचे फार मोठे योगदान परिषदेला प्राप्त झाले आहे.

परिषदेचा कार्यवाह – खजिनदार म्हणून आपण माझी पुन्हा एकदा अविरोध निवड करून माझ्यावर जो विश्वास व्यक्त केला आहे, त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे सुरुवातीलाच आभार व्यक्त करतो. आपले स्वागत करतो आणि २०२३-२४ या वर्षाचा ४६ वा वार्षिक अहवाल आपल्या समोर ठेवतो. कृपया आपण यास मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

मराठी अर्थशास्त्र परिषदेची एकूण आजीव सभासदांची संख्या **२०७०** पर्यंत पोहचली आहे. ही अभिमानाची बाब असली तरी आजीव सदस्य संख्येमध्ये वाढ घडवून आणण्याच्या दृष्टीने नवीन सदस्य नोंदणी करण्यासाठी आपण सर्वांनी सामुहिक प्रयत्न करण्याची गरज आहे. आपण ते करुया.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.नी. वि. सोवनी स्मृतीव्याख्यान अधिवेशन काळात आयोजीत केले जाते. ४६ व्या सासवड येथील अधिवेशात तेरावे पुष्प कुलगुरू डॉ.अजित रानडे यांनी **'आर्थिक वृद्धी आणि विषमता'** या विषयावर गुंफले आहे. परिषदेच्या ४० व्या वार्षिक अधिवेशनापासून परिषदेच्या माजी अध्यक्षांच्या योगदानाबाबत परिचय करून देणारे व्याख्यान दिले जाते. सासवड येथे परिषदेच्या ९ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ.ह. कृ.परांजपे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. दि.व्य.जहागीरदार यांनी **'भारताच्या विकासात्मक वाटचालीत रोजगाराचे वास्तव'** या विषयावर गुंफले आहे. सासवड येथील अधिवेशनात तीन विषयावर चर्चासत्रे आयोजित करून शोधनिबंध मागवण्यात आले होते. यामध्ये **'मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण', केंद्र पुरुस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती' व 'महाराष्ट्राच्या वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र'** हे चर्चासत्रासाठीचे विषय निश्चित करण्यात आले होते. साधारणपणे १०६ संशोधकांनी आपल्या शोधनिबंधाचे यावेळी वाचन केले. मा. अध्यक्षांच्या वतीने सुचविण्यात आलेला ऐनवेळच्या चौथ्या चर्चासत्राचा विषय **'भारतातील आधारभूत संरचनेचे मूल्यमापन'** यावर परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. संतोष दास्ताने यांनी विस्तृत मांडणी करून या विषयावर सभागृहात चर्चा घडवून आणली.

अधिवेशनाच्या काळात देण्यात येणारे विविध पुरस्कार व पारितोषिक यामध्ये प्रा. डॉ. अरुणा रारावीकर स्मृती (वृत्तपत्रातील लेखाला) आर्थिक लेख प्रथम पुरस्कार डॉ. माधव शिंदे यांच्या **शोकांतिका भारताच्या उपासमारीची** या लेखास तर द्वितीय पुरस्कार डॉ. अविनाश कुलकर्णी यांच्या **पेण मूर्ती कलेचा सांस्कृतिक वारसा** या लेखाला देण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक डॉ. आनंद शेवाळे व डॉ. विशाल बेलुरे यांच्या **'गणितीय अर्थशास्त्र व अर्थमिती'** या पुस्तकास देण्यात आले. श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक प्रा.डॉ. मुक्ता जहागीरदार यांच्या **परामर्श विकासाचा** या ग्रंथास देण्यात आले. प्रा. मो. स. भावे पारितोषिक (अर्थसंवाद मधील उत्कृष्ट लेख) डॉ. समित माहोरे – डॉ. रामदास माहोरे यांच्या **'आरोग्यावरील खर्च आणि आरोग्याची स्थिती : भारत आणि महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात'** आणि डॉ. राजकुमार वाईंगडे यांच्या **'बहुआयामी दारिद्र्य : दारिद्र्य मापनाचा नवा दृष्टीकोन'** या लेखाला विभागून देण्यात आले. स्व. प्रा. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथून पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात विद्यापीठातून प्रथम येणारा आकाश संपतराव ढोमणे यांना देण्यात आले. अधिवेशनात

सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधाचे कै.ग.प्र. पिंपरकर पारितोषिक डॉ. कारभारी भालचंद्र काशिनाथ यांच्या **'भारताच्या कृषिक्षेत्र विकासासाठी अमलात आणलेल्या शीतगृह साखळी विकास धोरणाची चिकित्सा'** या शोधनिबंधास देण्यात आले. प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (चर्चासत्रातील उत्कृष्ट सादरीकरण ) डॉ. गणेश बापूराव गावंडे यांच्या **'महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र आणि वास्तविकता'** या विषयाला देण्यात आले. डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक (अधिवेशन काळात सादर केलेला उत्कृष्ट शोधनिबंध विद्यार्थ्यांकरीता) गणेश आदिनाथ टेकळे यांच्या **'महाराष्ट्रातील वाहतूक व्यवस्थेचे अर्थशास्त्र'** या शोधनिबंधासाठी देण्यात आले. पदमजा गंधे पारितोषिक (अधिवेशन काळात सादर केलेला उत्कृष्ट शोधनिबंध महिलांकरिता) डॉ. तृप्ती कवळे यांच्या **'आरोग्य आणि मानवी भांडवल : सैद्धांतिक अवलोकन'** या लेखास देण्यात आला.

सासवड येथील साधारण सभेत ४७ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे, सातारा यांची बहुमताने निवड झाली. कार्यवाह-खजिनदार म्हणून डॉ. मारोती तेगमपुरे यांची अविरोध निवड करण्यात आली. विश्वस्त म्हणून डॉ.धोंडीराम भोजू पवार यांची अविरोध निवड झाली, कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून पुढील सदस्यांची निवड करण्यात आली. १. प्रा.डॉ. तलवारे जितेंद्र दगडू - कवयित्री बहिणावारी चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ. जळगाव. २. प्रा,डॉ. राजाराम केरबा पाटील, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. ३. भोसले हणुमंत अंकुशराव - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. ४. डॉ. शिंदे राजू कथ्थू , एस एन डी टी महिला विद्यापीठ, मुंबई. ५. डॉ.ठावरी विठ्ठल नीलकंठराव ( १ ते १० विद्यापीठ वगळता इतर विद्यापीठ) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. उपरोक्त सर्वच कार्यकारी मंडळ सदस्यांची निवड अविरोध करण्यात आली. तर डॉ. संजय विठ्ठल धोंडे, डॉ. अजय देरेकर यांची स्वीकृत सदस्य म्हणून कार्यकारी मंडळाने केली. स्थानिक कार्यवाह म्हणून प्रा.डॉ. बालाजी घुटे यांची नियुक्ती करण्यात आली. या सर्व मान्यवरांचे हार्दिक अभिनंदन.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्येष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन, पदाधिकारी आणि विश्वस्तांचा सल्ला, कार्यकारणी सदस्यांचे सहकार्य, जाहिरातदार व वर्गणीदार यांचे आर्थिक पाठबळ, वृत्तलेखक, सूत्रसंचालक व तज्ज्ञ परीक्षक यांची निरपेक्ष सेवा आणि समस्त आजीव सदस्यांचे सहकार्य यामुळे आपल्या परिषदेचा नावलौकिक वृद्धिंगत होत आहे. आपणा सर्वांना मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या वार्षिक अधिवेशनाचे (**दिनांक ३०,३१ जानेवारी व ०१ फेब्रुवारी २०२५**) आग्रहपूर्वक निमंत्रण..

**धन्यवाद!**

**आपलाच स्नेहांकित**

डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे

कार्यवाह-खजिनदार

## ४७ वी वार्षिक साधारण सभा

सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेवी ४७ वी वार्षिक साधारण सभा दिनांक ०१ फेब्रुवारी २०२५ शनिवार रोजी दुपारी १२:३० वाजता दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे पुढील कामकाजासाठी प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे, सातारा यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. आपण या सभेस उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

**स्थळ** : अंबड

**दिनांक** : १२ डिसेंबर २०२४

**आपलाच स्नेहांकित**

डॉ.मारोती विरभद्र तेगमपुरे

कार्यवाह खजिनदार

१. दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करणे.

२. सोमवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी १२:३० वाजता पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सासवड ता. पुरंदर जि. पुणे येथे संपन्न झालेल्या ४६ व्या वार्षिक साधारण सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणे. (जोडपत्र क्र. ००) पृष्ठ क्र. ०६

३. कार्यवाह - खजिनदारांनी सादर केलेला सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा अहवाल स्वीकारणे (जोडपत्र ०१) पृष्ठ क्र. ०८

४. अर्थसंवादच्या प्रमुख संपादकांनी सादर केलेला सन २०२३-२४ या आर्थिक वर्षांचा अहवाल स्वीकारणे. (जोडपत्र ०२) पृष्ठ क्र. ०९

५. परिषदेच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या हिशेबास (ताळेबंद) मंजूरी देणे (जोडपत्र ०३) पृष्ठ क्र. ११

६. परिषदेच्या व अर्थसंवादच्या सन २०२४-२५ या वर्षांच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे (जोडपत्र ०५अ/आ) पृष्ठ क्र. १३ व १४

७. परिषदेच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी लेखा परीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

८. परिषदेच्या ४८ व्या वार्षिक अधिवेशनाचे स्थान व चर्चासत्राचे विषय निश्चित करणे.

९. विश्वस्त डॉ. विकास सुकाळे यांची मुदत ३१ मार्च २०२५ रोजी पूर्ण होत आहे. दिनांक ०१ एप्रिल २०२५ ते दिनांक ३१ मार्च २०२८ या तीन वर्षासाठी एका विश्वस्तांची निवड करणे.

१०.परिषदेच्या दि. ०१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च, २०२६ या एका वर्षासाठी अध्यक्षांची निवड करणे.

११.परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम यांची मुदत ३१ मार्च २०२५ रोजी पूर्ण होत आहे. दिनांक ०१ एप्रिल २०२५ ते दिनांक ३१ मार्च २०२८ या तीन वर्षासाठी परिषदेच्या कार्याध्यक्षांची निवड करणे.

१२.०१ एप्रिल २०२५ ते दि. ३१ मार्च २०२८ या तीन वर्षांसाठी कार्यकारी मंडळावर सदस्यांची निवड करणे. मुदत संपणाऱ्या सदस्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

**अ.** डॉ. संजय धनवटे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

**आ.**डॉ. विजय भोपाळे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**इ.** डॉ. सुरेश घुमटकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

१३.मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

महत्वाच्या सूचना

१. गणपूर्ती अभावी वार्षिक साधारण सभा १५ मिनिटे तहकूब करून पुन्हा त्याच ठिकाणी सुरू होईल,अशा वेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२. कृपया सभेला येतांना वार्षिक अहवाल सोबत आणावा. (परिषदेच्या संकेतस्थळावर अहवाल उपलब्ध आहे.
३. परिषदेच्या विविध पदाच्या रिक्त जागांसाठी निवडणूकीचे अर्ज कार्यवाह - खजिनदार यांच्या अंबड जि.जालना येथील कार्यालयात मिळतील. प्रत्येक अर्जाची किंमत कार्यकारणी सदस्य पदासाठी १०००/- रुपये आणि अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त पदांसाठी २०००/- रुपये आहे. इच्छुकांनी मागणी केल्यास संबंधितांना अर्ज पाठविण्यात येईल.
४. उमेदवारी अर्ज कार्यवाह-खजिनदार यांचेकडे दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजेपर्यंत अधिवेशन स्थानी स्वीकारले जातील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
५. दिनांक ३१ जानेवारी २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी ज्या व्यक्ती परिषदेच्या आजीव सभासद झाल्या असतील, अशा सदस्यांनाच निवडणूक प्रक्रियेत भाग घेता येईल. आजीव सभासद क्र. **१९१३** पर्यंतचे सदस्यच फक्त निवडणूकीला उभे राहण्यास व मतदान करण्यास पात्र आहेत.
६. मतदान प्रक्रियेत सहभागी होताना आजीव सदस्यांजवळ स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र असणे आवश्यक आहे. यामध्ये आधारकार्ड, मतदानकार्ड (शासनाचे), पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, महाविद्यालयाचे प्राचार्यांनी दिलेले छायाचित्र असणारे ओळखपत्र यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे.
७. वार्षिक वृत्तांत, ताळेबंद, आय-व्यय पत्र या संबंधीचे व साधारण सभेत विचारावयाचे प्रश्न सदस्यांना परिषदेच्या कार्यालयाकडे (कार्यवाह) किमान ०५ दिवस अगोदर लेखी स्वरुपात पाठवावे लागतील.

डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे
कार्यवाह - खजिनदार

प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे
अध्यक्ष

## **४६ व्या वार्षिक साधारण सभेचे इतिवृत्त**

(जोडपत्र क्र. 00)

मराठी अर्थशास्त्र परिषेरेची ४६ वी वार्षिक साधारण सभा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड ता. पुरंदर जि. पुणे येथे मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. दिलीप अर्जुने यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी १२:३० वाजता संपन्न झाली.

सभेच्या सुरुवातीला परिषदेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा प्रस्ताव कार्यवाह-खजिनदार यांनी मांडल्यानंतर सभागृहाने उभे राहून मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर रितसर कामकाजास सुरुवात झाली. या सभेत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) सोमवार दि. ०७ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी १२.१५ वाजता जालना एज्युकेशन सोसायटीचे, आर जि बगडिया कला, एस. बी. लखोटिया वाणिज्य व आर, बेन्झजी विज्ञान महाविद्यालय, जालना येथे संपन्न झालेल्या ४५व्या वार्षिक साधारण सभेच्या इतिहत्तास मंजुरी देण्यात आली.

२) कार्यवाह-वजिनदारांनी सादर केलेल्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा अहवालस साधारण सभेने एकमताने मान्यता दिली. यावेळी चर्चेअंती अहवाल ऑनलाईन केल्याबद्दल अभिनंदनाचा ठरावही एकमताने मंजूर करण्यात आला.

३.) अर्थसंवादच्या प्रमुख संपादकांनी सादर केलेला सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा अहवाल साधारण सभेने एकमताने स्विकारून मान्यता देण्यात आली.

४) परिषदेच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या हिशोबास (ताळेबंद) मंजूरी देण्यात आली.

५) परिषदेच्या व अर्थसंवादच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली.

६) परिषदेच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी लेखा परिक्षकांची नेमणूक व मेहणताना ठरविण्याचा अधिकार कार्यवाह-खजिनदार यांना देण्यात आला.

७) परिषदेच्या ४७ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद लातूर येथील दयानंद महाविद्यालयास देण्यात यावा. यासंदर्भातील ठराव साधारण सभेने एकमताने मंजूर केला. तसेच ४७ व्या वार्षिक अधिवेशनात चर्चा सत्रासाठी तीन विषय कार्यकारी मंडळाने शिफारस केल्यानुसार चर्चा होऊन सभागृहाने पुढील तीन विषयास एकमताने मान्यता दिली.

**१) २०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषीक प्राप्त अर्थतज्ज्ञांचे आर्थिक विचार.**

**२) भारताच्या वित्तीय क्षेत्राच्या बदलत्या आकृतीबंधाचा अभ्यास.**

**३) महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्य विषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास.**

उपरोक्त विषयावर सभागृहात चर्चा होऊन एकमताने मंजूर करण्यात आले.

८) मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह-खजिनदार म्हणून डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे,अंबड यांची १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२७ या तीन वर्षासाठी अविरोध निवड करण्यात आली.

९) विश्वस्त म्हणून प्रा. पवार धोंडीराम भोजू यांची १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२७ या तीन वर्षासाठी अविरोध निवड करण्यात आली.

१०) दिनांक १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या एका वर्षासाठी परिषदेचे अध्यक्ष म्हणून डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे, सातारा यांची बहुमताने निवड करण्यात आली.

११) दिनांक १  एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२७ या तीन वर्षासाठी कार्यकारी मंडळ सदस्यांसाठी अविरोध निवड करण्यात  आली.  १. प्रा.डॉ. तलवारे जितेंद्र दगडू - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ. जळगाव. २. प्रा,डॉ. राजाराम केरबा पाटील, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. ३. भोसले हणुमंत अंकुशराव - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. ४. डॉ. शिंदे राजू कथ्थू , एस एन डी टी महिला विद्यापीठ, मुंबई.  ५. डॉ.ठावरी विठ्ठल नीलकंठराव, ( १ ते १० विद्यापीठ वगळता इतर विद्यापीठ) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने पुढील विषयावर चर्चा झाली.

१२.१) प्रा.डॉ.आर. एस सोळुंके यांचे नावे परिषदेचा एक उपक्रम म्हणून व्याख्यान सुरु करण्याची शिफारस कार्यकारी मंडळाने साधारण सभेस केली. साधारण सभेने एकमताने संमती दिली. नियमावली तयार करण्यासाठी कार्यकारी मंडळाने शिफारस केलेल्या समितीसही मान्यता देण्यात आली. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

१२.२) सर्वभाधारण सभा अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी घेण्याच्या संदर्भात विस्ताराने चर्चा साली. यावर परिषदेच्या अध्यक्षांनी असे सांगीतले की, पुढील वर्षी हा विषय मतदानासाठी टाकून यावर निर्णय घेण्यात येईल. ठराव मंजूर.

१२.३) अर्थसंवादचे मागील सर्व अंक स्कॅन करून पीडीएफ स्वरूपात संकेतस्थळावर टाकण्याचा प्रस्ताव चर्चेसाठी साधारण सभेसमोर ठेवण्यात आला, यास एकमताने मान्यता देण्यात आली. यावेळी या कामासाठी येणाऱ्या खर्चासही मान्यता देण्यात आली. ठराव मंजूर.

१२.४) परिषदेची इतरत्र असलेली सर्व बँक खाती एकत्र करावीत असा ठराव डॉ. माधव शिंदे यांनी मांडला. यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

१२.५) मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे सुरू झाले असून कार्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक वस्तू मान्यवरांनी भेट दिलेल्या आहेत. यामध्ये परिषदेचे माजी अध्यक्ष प्रा.डॉ. दि.व्य.जहागीरदार व प्रा.डॉ. मुक्ता  जहागीरदार (टेबल आणि व्हील चेअर), प्रा.चांकदत्त गोखले (पंचवीस चुर्चा), प्रा.डॉ. आर. बी. भांडवलकर (दोन पंखे) विश्वस्त प्रा.डॉ. अजय दरेकर, प्रा.डॉ. विकास सुकाळे (दोन कपाट), प्रा.डॉ. अनिल सुर्यवंशी, डॉ.वनिता चौरे (बुक शेल्फ). यावेळी त्यांच्या आभाराचा ठराव घेण्यात आला.

११.६) परिषदेच्या संकेतस्थळावर आजपर्यंतचे अर्थसंवादचे सर्व अंक उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असून त्यासाठी सामुहीक प्रयत्न करण्याची गरज असल्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

१२.७) अर्थसंवाद ऑनलाईन करून त्यावर होणारा खर्च कमी केल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव यावेळी सर्वानुमते मंजूर करण्यात आला. यासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्वांचे यावेळी आभार व्यक्त करण्यात आले.

सभेच्या शेवटी कार्यवाह-खजिनदार, डॉ. मारोती तेगमपुरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे**
कार्यवाह - खजिनदार

**प्रा. डॉ. दिलीप अर्जुने**
अध्यक्ष

**अ) मराठी अर्थशास्त्र परिषद लेखापरीक्षण अहवाल :** (जोडपत्र क्र ०१)

| **खर्च** | **३१ मार्च २०२३ रक्कम** | **३१ मार्च २०२४ रक्कम** | **उत्पन्न** | **३१ मार्च २०२३ रक्कम** | **३१ मार्च २०२४ रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| अहवाल छपाई | **३०,२००.००** | -- | बचत खात्यावरील व्याज | ५,४५९.०० | ४,८६८.०० |
| टपाल खर्च | ९,७५०.०० | ३,६८०.०० | सभासद सुची | २,९००.०० | १०,१००.०० |
| स्टेशनरी, छपाई व अंक संकेतस्थळावर सोडणे. | - | ८,६३३.०० | गुंतवणूकीवरील व्याज | २७७५३९.५२ | २,१४,१५९.२८ |
| बँक कमिशन | ८९७.०० | २१६.२८ | निवडणूक अर्ज विक्री | १०,३००.०० | २२,०००.०० |
| झेरॉक्स | १९२०.०० | २७४५.०० | इमारत निधी | ८१,०००.०० | ९०,०००.०० |
| प्रवास खर्च | १३३५०.०० | २०१००.०० | अधिवेशन प्रतिनिधी शुल्क | १४२५०.०० | २६९५०.०० |
| मानधन मदतनीस/ लेखणीस | ३८००.०० | ४०००.०० | आजीव सभासद वर्गणी | ९३,०००.०० | ३,०९,०००.०० |
| प्रिंटींग व इतर टायपिंग | ८७००.०० | ३६४४.०० | मुदत ठेव मोड | १५,४६,२७०.०० | - |
| किरकोळ खर्च | २६७०५.०० | १९००.०० | इतर जमा | ७५१.०० | १४,००२.०० |
| व्याख्यानमाला व पारितोषिके | ५१५००.०० | ४४५००.०० | डॉ.आर.एस.सोळुंके व्याख्यानमालेसाठी ठेव | - | ५,००,०००.०० |
| ऑडीट फी | १०,०००.०० | १०,०००.०० | | | |
| अधिवेशन खर्च आणि मानधन | १२,५०५.०० | १३,८००.०० | | | |
| कार्यालय खरेदीखत शुल्क | १३,४३६.०० | - | | | |
| कार्यालय उदघाटन | २८१४०.०० | - | | | |
| कार्यालय रंगरंगोटी | १५४१७.०० | - | | | |
| कार्यालय खरेदी | १७,२५,०००.०० | - | | | |
| आयकर | ५६२५.०० | - | | | |
| कार्यालय वीजबील | - | २०५०.०० | | | |
| अर्थसंवाद जुने अंक स्कॅन करणे | - | १३२०५.०० | | | |
| इनकम टॅक्स भरणा २२-२३ | - | २६५०.०० | | | |
| मुदत ठेव | - | ८,५०,०००.०० | | | |
| ज्यादा उत्पन्न | ७४४७४.५२ | २०५०८८.०० | | | |
| **एकूण रुपये =** | **२०३१४६९.५२** | **११८६२११.२८** | **एकूण रुपये =** | २०३१४६९.५२ | ११८६२११.२८ |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १२/१२/२०२४

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के &असोसीएटस**
सनदी लेखापाल

ब) अर्थसंवाद लेखापरीक्षण अहवाल (जोडपत्र क्र.०२)

| **खर्च** | **३१ मार्च २०२३ रक्कम** | **३१ मार्च २०२४ रक्कम** | **उत्पन्न** | **३१ मार्च २०२३ रक्कम** | **३१ मार्च २०२४ रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| अर्थसंवाद छपाई व कागद | २३२२५६.०० | १४२७९३.०० | अर्थसंवाद वर्गणी व जाहीरात | २१५०००.०० | ११४००१.०० |
| बँक कमिशन | ३२४.५२ | ४८७.१६ | म.रा.सा.सं.मंडळ मुंबई | ३४१६८.०० | ४४६३८.०० |
| मानधन | २५००.०० | २५००.०० | अर्थसंवाद तुट | १०११७.५२ | ३८४१.१६ |
| स्टेशनरी व इतर | - | २४०.०० | | | |
| पोस्टेज | १३९९५.०० | ६२१०.०० | | | |
| प्रिंटींग व इतर टायपिंग | ३४००.०० | ३४२०.०० | | | |
| झेरॉक्स | १८६०.०० | १८७०.०० | | | |
| प्रवास खर्च | ४९५०.०० | ४९६०.०० | | | |
| एकूण रुपये = | **२,५९,२८५.५२** | १६२४८०.१६ | एकूण रुपये = | **२,५९,२८५.५२** | १६२४८०.१६ |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १२/१२/२०२४

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के &असोसीएटस**
सनदी लेखापाल

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

४७ वे वार्षिक अधिवेशन

३०,३१ जानेवारी व ०१ फेब्रुवारी २०२५

दयानंद कला महाविद्यालय, लातुर.

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**ई) ठेव गुंतवणूक पत्र (जोडपत्र क्र.०४)**

(ठेव गुंतवणूक ३१ मार्च अखेरची)

| अ.क्र. | बँकेचे नाव | प्रमाणपत्र क्रमांक | रक्कम ३१ मार्च २०२३ | रक्कम ३१ मार्च २०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ३६०३ | २६०५९२.०० | २७६७९९.२९ |
| २. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ९४५२ | ७६२३९७.०० | ८०४६२२.१८ |
| ३. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ५६२७ | १५०००००.०० | १५०००००.०० |
| ४. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ५०३५३७१००००१६१ | ३४७५१३.०० | ३४७५१३.०० |
| ५. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ५०३५३७१००००२९३ | ८००००.०० | ८०००.०० |
| ६. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ५०३४५११००१३९८८ | १०४४७१.०० | १०९६४५.०० |
| ७. | स्टेट बँक ऑफ ,मुंबई | ३००५४८९५२५६ | ५५०००.०० | ५५,०००.०० |
| ८. | टाटा इनकम फंड | T-१-००००२८५९३५३८ | २०१२२.०० | २०,१२२.०० |
| ९. | युटीआय (सीआरटीएस) | १९९२१२१३/०३४४ | १५०७००.०० | १,५०,७००.०० |
| १०. | आय.डी.बी.आय. मुंबई | ७१०७००००३४८१२ | ५००००.०० | ५०,०००.०० |
| ११. | कॅनरा बँक, अंबड | १४०१३४३१७७६६/१ | - | ३,०३,०१२.०० |
| १२. | कॅनरा बँक, अंबड | १४०१३४३१७७६६/२ | - | ५०,३३९.०० |
| १३. | कॅनरा बँक, अंबड | ४०१०००१६८ | १००४५५३.०० | १०,७३,८६७.०० |
| १४. | बँक ऑफ महाराष्ट्रा, अंबड | ६०४८५८९४२३६ | - | ५,००,०००.०० |
| | | | **४३३५३४८.००** | **५३२१६१९.४७** |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १२/१२/२०२४

सही

**डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह-खजिनदार

सही

**धनंजय मस्के &असोसीएटस**

सनदी लेखापाल

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

## मराठी अर्थशास्त्र परिषद

४७ वे वार्षिक अधिवेशन

३०,३१ जानेवारी व ०१ फेब्रुवारी २०२५

दयानंद कला महाविद्यालय, लातुर.

# मराठी अर्थशास्त्र परिषद -ताळेबंद (जोडपत्र क्र.०३)

| वर्ष | | रक्कम | | रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि. ३१ मार्च २०२३ | | दि.३१ मार्च २०२४ | |
| स्थायी निधी | | | **७८,५१७.०६** | | **७८,५१७.०६** |
| आजीव सदस्य | मागील | २३५८२७९.०० | | **२४५१२७९.००** | |
| | जमा | ९३०००.०० | | ३०९०००.०० | |
| | | | **२४५१२७९.००** | | **२७६०२७९.००** |
| प्रकाशन निधी | | | ७८,६०७.०७ | | ७८,६०७.०७ |
| अर्थसंवाद स्थायी निधी | | | **३,३४,३५३.००** | | **३,३४,३५३.००** |
| इमारत निधी | मागील | १०८५०६९.०० | | ११६६०६९.०० | |
| | जमा | ८१०००.०० | | ९००००.०० | |
| | | | **११६६०६९.००** | | **१२५६०६९.००** |
| **पारितोषिके व पुरस्कार उपक्रम** | | | | | |
| धुळे व्याख्यानमाला निधी | | ७,५००.०० | | ७,५००.०० | |
| स्व. जमनालाल बजाज उपक्रम निधी | | ७५,०००.०० | | ७५,०००.०० | |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा वि. ग्रंथ पारितोषिक निधी | | १०,०००.०० | | १०,०००.०० | |
| मो.स.भावे पारितोषिक निधी | | ५,०००.०० | | ५,०००.०० | |
| कै.ग.प्र.पिंपरकर पारितोषिक निधी | | १३,५००.०० | | १३,५००.०० | |
| डॉ. रविंद्र सबनीस निधी | | ५०,०००.०० | | ५०,०००.०० | |
| डॉ.के.एच.ठक्कर पारितोषिक निधी | | ६,०००.०० | | ६,०००.०० | |
| श्रीमती पद्मजा गंधे पारितोषिक निधी | | २५,०००.०० | | २५,०००.०० | |
| डॉ.ज.फा.पाटील पारितोषिक निधी | | २५,०००.०० | | २५,०००.०० | |
| मातोश्री बयाबाई श्री.कदम पारितोषिक निधी | | २,००,०००.०० | | २,००,०००.०० | |
| सौ.अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार | | २५,०००.०० | | २५,०००.०० | |
| प्रा. नि.वी.सोवनी स्मृती व्याख्यान निधी | | १,६४,५५०.०० | | १,६४,५५०.०० | |
| डॉ.सुधा मोकाशी पारितोषिक निधी | | १,००,०००.०० | | १,००,०००.०० | |
| स्व.प्रा.भास्कर ढाले पुरस्कार निधी | | ३०,०००.०० | | ३०,०००.०० | |
| डॉ. शंकर मोडक पुरस्कार निधी | | १,००,०००.०० | | १,००,०००.०० | |
| | | | **८,३६,५५०.००** | | **८,३६,५५०.००** |
| अग्रिम सुचीकरीता | मागील | **१२,६००.००** | | १५५००.०० | |
| | जमा | **२,९००.००** | | १०१००.०० | |
| | | | १५५००.०० | | **२५६००.००** |
| अर्थसंवाद तुट निधी | | | १,५००.०० | | १,५००.०० |
| इतर देणे | मागील | ८४३५१.०० | | ५८९४२.०० | |
| | जमा | ५२९७१.०० | | १०४०२.०० | |
| | | १३७३२२.०० | | ६९३४४.०० | |
| | अधिक चालू | -७८३८०.०० | | -५२९७१.०० | |
| | | | **५८९४२.००** | | **१६३७३.००** |
| डॉ.आर.एस.सोळुंके व्याख्यानमाला ठेव | | | -- | | **५०००००.००** |
| उत्पन्न खर्च हिशोब ताळेबंदाप्रमाणे | मागील | २११७१४५.०० | | २१९२७०४.४८ | |
| अधिक चालू वर्षाची वाढ (Capital Receipt 15500) | | ७५५५९.४८ | | १९११४७.०० | |
| | | | २१९२७०४.४८ | २३८३८५१.४८ | |
| | | - | | | २३८३८५१.४८ |
| | | | **७२१४०२२.००** | | **८२७१६९८.१६** |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १२/१२/२०२४

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के &असोसीएटस**
सनदी लेखापाल

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

ताळेबंद (जोडपत्र क्र. ०५)

| **जिंदगी** | | **रक्कम** | | **रक्कम** | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि. ३१ मार्च २०२३ | | दि. ३१ मार्च २०२४ | |
| मुदतठेव व गुंतवणूक | | | **४३८०१८९.००** | | **५३५२५८३.००** |
| **रोख बँकेतील शिल्लक** | | | | | |
| स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई | | ४५३२४.८४ | | ४५३२४.८४ | |
| बँक ऑफ इंडिया पुणे | | ५९७५२६.२४ | | ७१७८९६.२४ | |
| बँक ऑफ इंडिया कोहापूर | | १७६४७६.६८ | | १७२६३५.५२ | |
| कॅनरा बँक अंबड | | ७९००५.२८ | **८९८३३२.२०** | २७५३७.४० | **९६३३९३.१६** |
| | | | | | |
| व्याजावरील TDS | मागील | १८४७४०.०० | | २१०५०१.०० | |
| | चालू | २५७६१.०० | | २०२२१.०० | |
| | एकूण | २१०५०१.०० | | | |
| | परत | | **२१०५०१.००** | | **२३०७२२.००** |
| **Building Office** | | | **१७,२५,०००.००** | | **१७,२५,०००.००** |
| **एकूण रुपये** | | | **७२,१४,०२२.००** | | **८२,७१,६९८.१६** |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १२/१२/२०२४

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के & असोसीएटस**
सनदी लेखापाल

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

## मराठी अर्थशास्त्र परिषद

४७ वे वार्षिक अधिवेशन

३०,३१ जानेवारी व ०१ फेब्रुवारी २०२५

दयानंद कला महाविद्यालय, लातुर.

**मराठी अर्थशास्त्र परिषद अंदाजपत्रक**

**(जोडपत्र क्र.०५/ अ) २०२५-२६**

| खर्च | रक्कम ३१ मार्च | उत्पन्न | रक्कम ३१ मार्च |
|---|---|---|---|
| प्रवास खर्च | २४,०००.०० | साधारण शुल्क | १,२००.०० |
| हिशोब लिहिण्याचा मेहनताना | ५,५००.०० | बचत खात्यावरील व्याज | २६,०००.०० |
| लेखापरीक्षण शुल्क | ११,०००.०० | मुदत ठेवीवरील व्याज | ३,५०,०००.०० |
| बँक कमिशन | १२००.०० | निवडणूक अर्ज विक्री | १५,०००.०० |
| मानधन | ६०००.०० | पा.वा.गाडगीळ व्याख्यान | ५,०००.०० |
| टपाल खर्च | २०,०००.०० | प्रतिनिधी शुल्क | १५,०००.०० |
| अहवाल छपाई व कागद | ६,०००.०० | अर्थसंवाद वर्गणी | ७५,०००.०० |
| स्टेशनरी | ६,०००.०० | जाहिरात | ५०,०००.०० |
| व्याख्यानमाला व पारितोषिक किरकोळ खर्च | ५०,०००.०० | | |
| टायपिंग व झेरॉक्स खर्च | ८,०००.०० | | |
| परिषदेची वास्तू – विविध कर, वीज बिल व स्वच्छता | २५,०००.०० | | |
| अर्थसंवाद तूट | ९,४००.०० | | |
| ज्यादा उत्पन्न | ३,७४,५००.०० | | |
| **एकूण रुपये** | **५,३७,२००.००** | **एकूण रुपये** | **५,३७,२००.००** |

**स्थळ :** अंबड
**दिनांक :** १२/१२/२०२४

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के & असोसीएटस**
सनदी लेखापाल

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

## मराठी अर्थशास्त्र परिषद

४७ वे वार्षिक अधिवेशन

३०,३१ जानेवारी व ०१ फेब्रुवारी २०२५

दयानंद कला महाविद्यालय, लातुर.

**मराठी अर्थशास्त्र परिषद अंदाजपत्रक**

**(जोडपत्र क्र.०५/ आ) २०२५ – २६**

| **खर्च** | **रक्कम ३१ मार्च** | **उत्पन्न** | **रक्कम ३१ मार्च** |
|---|---|---|---|
| अर्थसंवाद छपाई | १,५७,०००.०० | अर्थसंवाद वर्गणी | ७५,०००.०० |
| स्टेशनरी | ३,५००.०० | जाहिरात | ५०,०००.०० |
| टपाल खर्च | ६,०००.०० | म.रा.सा.स.मंडळ,मुंबई | ४५,०००.०० |
| मानधन | २५००.०० | बँक व्याज | ६००.०० |
| प्रवास खर्च | ५,०००.०० | अर्थसंवाद तूट | ९,४००.०० |
| बँक कमिशन | ५००.०० | | |
| झेरॉक्स | २,५००.०० | | |
| प्रिटींग व टायपिंग | ३,०००.०० | | |
| **एकूण रुपये** | **१,८०,०००.००** | **एकूण रुपये** | **१,८०,०००.००** |

**स्थळ** : अंबड
**दिनांक :** १२/१२/२०२४

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के & असोसीएटस**
सनदी लेखापाल

## परिषदेचे विविध उपक्रम

*** स्व. जमनालाल बजाज उपक्रम**

*** टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व्याख्यानमाला**

*** पत्रपंडित पा.वा.गाडगीळ व्याख्यान**

*** भार्तीयार्जीत नोबेल पुरस्कार स्मृती परिसंवाद**

*** डॉ. सुधा मोकाशी पुरुस्कृत (व्याख्यान) चर्चा सत्र**

*** डॉ. नी.वि.सोवनी व्याख्यान (अधिवेशन काळात)**

*** माजी अध्यक्षांचे योगदानाबाबत व्याख्यान**
**(अधिवेशन काळात)**
*** धुळे व्याख्यानमाला**

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष

| अधिवेशन | नांव | वर्ष | अधिवेशन | नांव | वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ ले | डॉ. नी.वि.सोवनी | १९७७-७८ | २५ वे | डॉ. अ.रा. पडोशी | २००१-०२ |
| २ रे | डॉ. वि.म.दांडेकर | १९७८-७९ | २६ वे | डॉ. संतोष दास्ताने | २००२-०३ |
| ३ रे | डॉ. श्री.आ.देशपांडे | १९७९-८० | २७ वे | डॉ. सूर्यकांत जगदाळे | २००३-०४ |
| ४ थे | डॉ.वि.वि.बोरकर | १९८०-८१ | २८ वे | डॉ. मधुकर शिंदे | २००४-०५ |
| ५ वे | प्राचार्य या.शि.महाजन | १९८१-८२ | २९ वे | डॉ. सर्जेराव ठोंबरे | २००५-०६ |
| ६ वे | डॉ.आनंद नाडकर्णी | १९८२-८३ | ३० वे | प्रा. दिलीप कदम | २००६-०७ |
| ७ वे | डॉ. स.ह.द देशपांडे | १९८३-८४ | ३१ वे | डॉ. पी.बी. कुलकर्णी | २००७-०८ |
| ८ वे | डॉ. वि.बा.घुगे | १९८४-८५ | ३२ वे | डॉ. व्ही.बी. भिसे | २००८-०९ |
| ९ वे | डॉ. ह.कृ.परांजपे | १९८५-८६ | ३३ वे | डॉ. विनायक देशपांडे | २००९-१० |
| १० वे | डॉ. रविंद्र सबनीस | १९८६-८७ | ३४ वे | डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार | २०१०-११ |
| ११ वे | डॉ. गो.सी.कल्याणकर | १९८७-८८ | ३५ वे | डॉ. आ.गो.पुजारी | २०११-१२ |
| १२ वे | डॉ. नलिनी पंडित | १९८८-८९ | ३६ वे | डॉ. कैलास पाटील | २०१२-१३ |
| १३ वे | डॉ. रविंद्र दोशी | १९८९-९० | ३७ वे | प्राचार्य डॉ.जगन्नाथ पाटील | २०१३-१४ |
| १४ वे | डॉ.श्रीनिवास खांदेवाले | १९९०-९१ | ३८ वे | डॉ. श्रीराम जोशी | २०१४-१५ |
| १५ वे | डॉ. ज.फा. पाटील | १९९१-९२ | ३९ वे | डॉ. सुहास आव्हाड | २०१५-१६ |
| १६ वे | डॉ. शशिकांत गंधे | १९९२-९३ | ४० वे | डॉ. शिवाजी भोसले | २०१६-१७ |
| १७ वे | डॉ. व्य.सु.पाटणकर | १९९३-९४ | ४१ वे | डॉ. रामचंद्र रसाळ | २०१७-१८ |
| १८ वे | डॉ. के.जि. पठाण | १९९४-९५ | ४२ वे | प्रा. चारुदत्त गोखले | २०१८-१९ |
| १९ वे | प्रा. शि.ना. माने | १९९५-९६ | ४३ वे | डॉ. रामदास माहोरे | २०१९-२० |
| २० वे | डॉ. भ.ग. बापट | १९९६-९७ | ४४ वे | प्राचार्य डॉ. अनिल सुर्यवंशी | २०२०-२२ |
| २१ वे | डॉ. दि.व्य. जहागिरदार | १९९७-९८ | ४५ वे | डॉ. आर.बी. भांडवलकर | २०२२-२३ |
| २२ वे | डॉ. र.पु. कुरुलकर | १९९८-९९ | ४६ वे | डॉ. दिलीप सोपानराव अर्जुने | २०२३-२४ |
| २३ वे | डॉ. सु.दा.तुपे | १९९९-०० | ४७ वे | डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे | २०२४-२५ |
| २४ वे | डॉ. भालचंद्र मुणगेकर | २०००-०१ | | | |

**मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विविध पारितोषिके**

★डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (रु. १०००/-)

★ प्रा.मो.स.भावे पारितोषिक (अर्थसंवाद मधील उत्कृष्ट लेख) (रु. ५००/-)

★मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक (रू.११०००/-)

★प्रा. सौ.अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार (वृत्तपत्रातरील लेख प्रथम रू.१०००/- व द्वितीय पुरस्कार रु. ५००/-)

★कै.ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोधनिबंध) (रू.१०००/-)

★प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (स. ५००/-)

★ डॉ. शंकर मोडक पुरस्कार (रु.५०००/-)

★ डॉ. रविंद्र सबनीस पारितोषिक (रू.४०००/-)

★ डॉ.ज.फा. पाटील पारितोषिक (अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध विध्यार्थ्यासाठी) (रू.२०००/-)

★ पद्मजा गंधे पारितोषिक ( अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध महिलांकरीता) (रू. १०००/-)

★स्व. प्रा. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास (रू. २०००/-)


मराठी अर्थशास्त्र परिषद














वाघीरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय















बुक-पोस्ट

प्रति,

____________________

____________________


✻ प्रेषक ✻

## डॉ.मारोती तेगमपुरे

कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद
संगाई घर नं.२२, शहीद भगतसिंगनगर,
भालचंद्र पेट्रोल पंपामागे,पारनेर रोड,अंबड
जि.जालना - ४३१२०४, भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७